**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये वार्षिक सरासरीच्या सुमारे ९५ टक्के परदेशी गुंतवणूक
- महिला लोकप्रतिनिधींच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन निश्चित उपाययोजना करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन
- क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना सर्वत्र आदरांजली
- बॉर्डर-गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या अखेरच्या सामन्यात भारताचा पहिला डाव १८५ धावांमधे आटोपला

**आणि**

- मुंबई-गोवा महामार्गावर आज झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू

**<><><><><>**

परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र सातत्याने अग्रेसर राहिला असून चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये राज्यात वार्षिक सरासरीच्या सुमारे ९५ टक्के गुंतवणूक आली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीच्या आकडेवारीत ही बाब स्पष्ट झाल्याचं  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्स या समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

या कालावधीत १ लाख १३ हजार २३६ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक राज्यात झाली. हे प्रमाण गेल्या चार वर्षातल्या सरासरीच्या ९४ पूर्णांक ७१ शतांश टक्के आहे.

महाराष्ट्र आता थांबणार नाही,  ही घौडदौड अशीच कायम राहील, अशी ग्वाहीदेखील  मुख्यमंत्र्यांनी  दिली आहे.

**<><><><><>**

महिला लोकप्रतिनिधींच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन निश्चित उपाययोजना करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. सातारा जिल्ह्यात नायगाव इथं क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात आज ते बोलत होते.....

**<><><><><>**

स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त त्यांना सर्वत्र आदरांजली वाहण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह इतर मान्यवरांनी सावित्रीबाईंच्या योगदानाचं स्मरण केलं आहे.

सावित्रीबाई फुले या स्त्री सक्षमीकरणाच्या जनक होत्या. शैक्षणिक, सामाजिक सुधारणा क्षेत्रातल्या त्या प्रणेत्या होत्या, असे गौरवोद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या संदेशात काढले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईतल्या त्यांच्या वर्षा शासकीय निवासस्थानी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या संदेशात स्त्रीशिक्षणासाठी, प्लेगपीडितांसाठी सावित्रीबाईंनी केलेल्या कार्याचं स्मरण केलं आहे आणि सर्व महिलांना **महिला शिक्षण** दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही समाजमाध्यमावरच्या संदेशात सावित्रीबाई फुले यांना आदरांजली वाहिली आहे.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचं स्मरण केलं आहे. सावित्रीबाईंनी महिला शिक्षणाचे दरवाजे उघडले, तसंच समाजातल्या वंचित, पीडित आणि शोषित घटकांच्या हक्कांसाठी जोरदार लढा दिला, असं खरगे यांनी म्हटलं आहे.

नाशिकमध्ये मुंबई नाका इथं उभारण्यात आलेल्या सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्याला माजी मंत्री आणि समता परिषदेचे नेते छगन भुजबळ यांनी अभिवादन केलं.

राज्याचे राजशिष्टाचार आणि पणनमंत्री जयकुमार रावल यांनीही सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहिली. नंदुरबारमधल्या माळीवाड्यातल्या महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आज सकाळी धुळे शहरातील महाजन हायस्कूलच्या विध्यार्थ्यांनी वाजत गाजत शोभायात्रा काढली. विद्यार्थिनींनी

सावित्रीबाई फुले यांच्या जयजयकाराच्या घोषणा देत लेझीम नृत्य सादर केले. पुष्पहार अर्पण करुन त्यांनी  अभिवादन केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दिल्लीत विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली. जेजे क्लस्टर्समध्ये राहणाऱ्यांसाठी नव्यानं बांधण्यात आलेल्या जवळपास सतराशे सदनिकांचं उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं, तसंच राष्ट्रीय राजधानीच्या अशोक विहार भागातील पात्र लाभार्थींना या घरांच्या चाव्याही सुपूर्द केल्या. कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्र्यांनी झोपडीवासियांसाठी बांधलेल्या नव्या सदनिकांची पाहणी केली तसंच स्थानिकांशी संवाद साधला. दिल्ली विद्यापीठाच्या जवळपास सहाशे कोटी रुपये खर्चाच्या तीन प्रकल्पांची पायाभरणी प्रधानमंत्री मोदी यांनी केली तसंच नजफगडच्या रोशनपुरा भागात वीर सावरकर महाविद्यालयाची कोनशिलाही त्यांच्या हस्ते बसविण्यात आली, तसंच केंद्रीय शिक्षण मंडळाच्या नवीन विस्तारित परिसराचं लोकार्पण त्यांनी केलं.  केंद्रीय गृहनिर्माण आणि नगरविकास मंत्री मनोहर लाल यांचंही भाषण यावेळी झालं.

**<><><><><>**

राजधानी दिल्ली परिसरातली वाहतूक खोळंब्याची स्थिती सुधारावी तसंच प्रदूषण कमी व्हावं यादृष्टीनं केंद्रीय वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल  एका प्रकल्पाची घोषणा केली. सुमारे साडे बारा हजार

कोटी रुपयांच्या या प्रकल्पामुळे दिल्ली- कटरा एक्सप्रेसवे तसंच डेहराडून - द्वारका एक्सप्रेसवे हे रस्ते इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाला थेट जोडले जातील. यामुळे अनेक वाहनांना दिल्ली शहरात येण्याची गरज उरणार नाही.

**<><><><><>**

२०२४ या वर्षात जगभरातला सर्वाधिक भांडवली निधी NSE अर्थात राष्ट्रीय शेअर बाजारातून उभारला गेला. आशियातल्या सर्वाधिक IPO- प्राथमिक समभाग विक्रींची नोंदही या शेअर बाजारात झाल्याचं NSE नं पत्रकात म्हटलं आहे.

गेल्यावर्षी भारतीय बाजारातून कंपन्यांनी साडे १९ अब्ज डॉलरचा निधी गोळा केला. अमेरिकेच्या नॅसडॅकमधून साडे १६ अब्ज डॉलर आणि न्यूयॉर्क शेअर बाजारातून सुमारे १६ अब्ज डॉलरचा निधी या कालावधीत कंपन्यांनी गोळा केला. २०२४ या वर्षात राष्ट्रीय शेअर बाजारात एकूम २६८ IPO ची नोंद झाली. त्यात ९० मोठ्या कंपन्यांचे आणि १७८ लघू आणि मध्यम कंपन्यांचे होते. चीनच्या शांघाय शेअर बाजारात गेल्यावर्षी १०१ तर जपानच्या शेअर बाजारात ९३ IPO आले होते.

**<><><><><>**

बॉर्डर गावस्कर चषक भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया क्रिकेट कसोटी मालिकेत सिडनी इथं सुरू असलेल्या अखेरच्या सामन्यात भारताचा पहिल्या डाव

१८५ धावांवर आटोपला. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऋषभ पंत ने सर्वाधिक ४० धावा केल्या तर रवींद्र जाडेजा ने २६ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या बोलांड ने ३१ धावात ४ गडी बाद केले. ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव सुरु झाला असून दिवसअखेर १ बाद ९ धावा झाल्या आहेत.

<><><><><>

नेमबाज स्वप्नील कुसाळे याला यंदा अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्याने आकाशवाणीशी बोलताना आनंद व्यक्त केला. ....

<><><><><>

मुंबई-गोवा महामार्गावर आज झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाले. वीर रेल्वे स्थानकाजवळ एका टोइंग वाहनानं रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कारला जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला. ज्यामुळे कारमधले तीन जण जागीच ठार झाले तर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

<><><><><>

नवी मुंबईच्या सानपाडा भागात दोन मोटारसायकलस्वारांनी एका व्यक्तीवर गोळीबार केला. आज सकाळी साडे नऊच्या सुमारास ही घटना घडली.

त्यात ती व्यक्ती जखमी झाली असून या प्रकरणाचा अधिक तपास सुरु आहे, असं नवी मुंबई गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अमित काळे यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**